वर्ष-०७ अंक-३५ मुंबई, मंगळवार २० ते २६ जुलै २०२१ पृष्ठ-४

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021



• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक



PG 2 पुणे-युवतीला पळवून नेल्याच्या रागातून प्रियकरासह दोघांचा खून; परिसरात खळबळ

3 → व्यापाऱ्याकडून शेतकऱ्याची फसवणूक; 'तो' भाजीव्यापारी गाळा विकून गायब

ऑनलाइन मागविलेले पार्सलमधील महागडी वस्तू काढून तिने साबण ठेवला अन्... ← 4



www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page



## ठाण्यात 3 दिवसांपासून पावसाचा कहर



ठाणे, मागील तीन दिवसांपासून ठाण्यात पावसानं कहर केला आहे. ठाणे शहरासह जिल्ह्याला पावसानं चांगलचं झोडपून काढलं आहे. यामुळे ठाण्यातील अनेक सखल भागात पाणी साचलं आहे. तर ठाण्यानजीक असणारा मासूंदा तलाव देखील ओसंडून वाहू लागला आहे. त्यामुळे शहराला पुरजन्य परिस्थिती आली आहे. ठाणे महानगर पालिकेच्या मुख्यालयाबाहेरही गुडघाभर पाणी साचलं आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांचं जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहेत. याशिवाय हाजूरी, राम मारुती रोड, कासारवडवली, वागळे इस्टेट, नौपाडा, ...पान २ वर...

## मुंबईत पावसाचा 'हाय अलर्ट', मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन प्रशासनाला दिले हे आदेश

### 'मुंबई व कोकण किनारपट्टीसाठी पुढील पाच दिवस ऑरेंज अलर्ट असून 50 ते 60 किमी प्रती तास या वेगाने वारेही वाहतील'



मुंबई, हवामान विभागाने पुढील चार ते पाच दिवस दिलेला पावसाचा इशारा लक्षात घेता मुंबई महानगरपालिका तसंच इतर सर्व यंत्रणांनी अपेक्षित तसेच अनपेक्षितरीत्या देखील घडणाऱ्या दुर्घटनांच्या बाबतीत अतिशय सावधगिरी बाळगावी व समन्वयाने काम करावे, असे आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईत अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. या बैठकीत मुंबई उपनगरचे पालकमंत्री आदित्य ठाकरे आणि मुंबई शहर पालकमंत्री अस्लम शेख यांनी देखील सुचना केल्या.

विशेषत: दरडी कोसळू शकतात अशा ठिकाणी पालिकेचे लक्ष असले तरी अनपेक्षित दुर्घटन घडणार नाही याची काळजी घ्या. आज चेंबूर, विक्रोळी येथील दुर्घटनेत संरक्षक भिंतीच्या वरून मागील टेकडीचा भाग घरांवर पडल्याने मोठ्या प्रमाणावर मलबा पसरून प्राणहानी झाली ही गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे. गेल्या वर्षी देखील मलबार हिल येथे टेकडीचा भाग अचानक खचला होता. उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांच्या टॉवर्सखाली मोठ्या प्रमाणावर वस्त्या आहेत, त्याबाबतही वीज कंपन्यांना तातडीने सांगून खबरदार राहण्यास सांगावे. काही ठिकाणी भूमिगत वाहनतळामध्ये पाणी घुसले व वाहनांचे नुकसा झाले आहे तसेच भांडूप येथे जल शुद्धीकरण केंद्रच बंद पडल्याची घटना घडली आहे हे पाहता अधिक सावधगिरी बाळगावी, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी दिली.

'पावसाचा जोर रात्री वाढतो आहे हे ९ जून आणि आत्ता काल झालेल्या पावसाने लक्षात आले आहे हे पाहता रात्री देखील पाणी उपसा करणारी यंत्रान, कर्मचारी काम करीत राहतील हे पाहावे. पाउस थांबल्यानंतर मोडकळीस आलेल्या इमारती अधिक कमकुवत होऊन त्यांचा काही भाग पडून मोठी दुर्घटना घडते. मोडकळीस आलेल्या इमारती मग त्या पालिका किंवा म्हाडाच्या अखत्यारीतील असोत, खूप धोकादायक इमारतीतील ...पान २ वर...

## करोना परिस्थिती नियंत्रणात



ठाणे : महापालिका क्षेत्रामध्ये आठ दिवसांपूर्वी सक्रिय करोना रुग्णांची संख्या एक हजारांच्या पुढे गेल्याने शहराची चिंता वाढली होती, परंतु दोन दिवसांतच रुग्ण संख्येचा आकडा पुन्हा एक हजाराच्या आत आला आहे. हा आकडा अद्यापही कायम आहे. तसेच शहरामध्ये शंभरच्या आत करोना रुग्ण आढळून येत आहेत. त्यामुळे शहरातील करोना परिस्थिती नियंत्रणात असल्याचे चित्र आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.८२ टक्क्यांवर, तर रुग्ण दुपटीचा कालावधी १४६१ दिवसांवर पोहचला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये जून महिन्यात करोनाची परिस्थिती नियंत्रणात आली होती. कळवा परिसरात १५ च्या आत रुग्ण आढळून येत होते. २१ जून रोजी या भागात ३७ रुग्ण आढळून आले होते, तर शहराच्या उर्वरित भागात २० च्या आत रुग्ण होते. कळव्यातील काही भागांमध्ये करोना रुग्ण संख्येत वाढ होऊ लागल्याने महापालिका यंत्रणा सतर्क झाली होती. यानंतर पालिका प्रशासनाने कळवा परिसरात करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्यास सुरुवात केली आणि दोन ते तीन दिवसांत येथील परिस्थिती पुन्हा आटोक्यात ...पान २ वर...

## अननस, फणसाच्या गोण्यातून गांजा तस्करी; आरोपींना कोठडी



जवळपास १,८७८ किलोच्या गांजा तस्करीप्रकरणी मुख्य आरोपीला एनडीपीएस न्यायालयाने २१ जुलैपर्यंत महसूल गुप्त वार्ता संचालनालयाच्या (डीआरआय) कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला, तर अन्य पाच आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली. विशेष न्यायाधीश अजित मरे यांनी हा आदेश दिला. त्यानुसार धर्मराज शिंदे याला डीआरआय कोठडी सुनावण्यात आली आहे, तर अभिषेक धावटे, श्रीनिवास पवार, विलास पवार, अविनाश भोंडवे व विनोद राठोड यांची कारागृहात ...पान २ वर...

## पुणे-वृद्धांना गुंगीचे औषध देऊन सोने लुटणाऱ्या झारखंडच्या महिलेला अटक

ज्येष्ठ महिलांना पेढ्यातून गुंगीचे औषध देऊन त्यांच्याजवळील सोन्याचे दागिने लुटून नेणाऱ्या झारखंडच्या एका कुविख्यात महिलेला पुणे पोलिसांनी सीसीटीव्हीच्या मदतीने अटक केली. या महिलेने राज्यासह देशभरातील धार्मिक स्थळांच्या ठिकाणी उच्छाद मांडला होता.





पिंकी परियाल (वय ३४) असे अटक केलेल्या महिलेचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्यवस्तीत फुटपाथवर बसलेल्या एका ७२ वर्षीय महिलेला महिन्याला दोन हजार रुपये मिळवून देण्याचे आमिष दाखवून, आरोपी महिलेने रिक्षातून स्वारगेट भागात नेले होते. तेथे संबंधित महिलेने त्यांना खाण्याच्या पदार्थात गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध केले. त्यानंतर आरोपी महिलेने त्यांच्या गळ्यातील अडीच तोळे सोन्याची साखळी आणि रोकड असा ऐवज चोरून नेला होता. या प्रकरणी फरासखाना पोलिस ठाण्यात अज्ञात महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणी तपास करताना फरासखाना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली. त्यात आरोपी महिला दिसली. ती महिला गुन्हेगार असून, तिच्यावर सांगली आणि शिर्डीतही गुन्हे दाखल असल्याचे समोर आले. पोलिस अंमलदार मेहबूब मोकाशी यांना मिळालेल्या माहितीनुसार, पुणे स्टेशन परिसरात सापळा रचून तिला पकडले. चौकशीत तिने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानुसार तिला अटक करण्यात आली आहे.

अशी होती चोरीची पद्धत...

देव दर्शनासाठी मंदिरात आलेल्या एकट्या वृद्ध महिलांना हेरून, आरोपी महिला त्यांच्यासोबत गप्पा मारत असे. त्यांना आमिष दाखवून दुसऱ्या ठिकाणी नेऊन पेढ्यात गुंगीचे औषध घालून देत असे. वृद्ध महिला बेशुद्ध होताच त्यांच्याकडील सोन्याचे दागिने आणि मौल्यवान वस्तू चोरून नेत असे.

## अल्पवयीन मुलांना घरात ठेवले कोंडून; कंत्राटदारांच्या तावडीतू मुलांची सुटका



वर्धा : झारखंड राज्यातील ११ अल्पवयीन मुलांना घरात कोंडून त्यांना उपाशी ठेवण्याचा प्रकार कंत्राटदारांकडून घडल्याचा प्रकार वर्धा जिल्ह्यात समोर आला आहे. बोरीबारा येथील पाइप बनविणाऱ्या कंपनीमध्ये हे ही मुले काम करीत होती. बाल संरक्षण कक्षाने पोलिसांच्या मदतीने या मुलांची कंत्राटदारांच्या तावडीतून सुटका केली.रसुलाबादनजीकच्या बोरीबारा परिसरात रस्त्याच्या कामावर काही अल्पवयीन मुले असल्याची माहिती बाल संरक्षण कक्षाला ...पान २ वर...


## दारु प्यायल्यानंतर उद्भवलेल्या वादातून गुन्हेगाराचा निर्घृण खून



दारू प्यायल्यानंतर उद्भवलेल्या वादातून दोघांनी टिकास व फावड्याने वार करीत गुन्हेगार गब्बर ऊर्फ सचिन इरपाते (वय ४०, रा. संजय गांधीनगर, हुडकेश्वर) याची निर्घृण हत्या केली. हत्येनंतर मारेकऱ्यांनी गब्बरचा मृतदेह धुवून तो खड्ड्यात फेकला. ही थरारक घटना शनिवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास कोराडीतील चक्कीखापा येथे उघडकीस आली. खून करून पुरावा नष्ट केल्याचा गुन्हा कोराडी पोलिसांनी दाखल केला. तसेच रवी नारायण पाराडे (वय ५२, रा. विष्णूमातानगर) व सुभाष सखाराम भाकरे (वय ५८, रा. महाकालीनगर) या दोन मारेकऱ्यांना अटक केली. सचिनविरुद्ध अजनी पोलिस स्टेशनमध्ये मारहाणीचे तर, रवी व सुभाषविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. काही वर्षांपासून तिघेही गुन्हेगारी सोडून सामान्य जीवन जगायचे. चक्कीखापा परिसरात सोहेल राणा यांची शेती असून, तेथे रिसॉर्टचे बांधकाम सुरू आहे. तिघेही तेथे काम करतात व तिथेच एका खोलीत राहतात. शुक्रवारी रात्री १० वाजताच्या सुमारास तिघांनी दारू प्यायली. त्यानंतर दोघांचा गब्बरसोबत वाद झाला. गब्बरने दोघांना शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली. तो मद्यधुंद अवस्थेत खुर्चीवर बसला होता. गब्बर ठार मारेल, या भीतीने दोघांनी त्याचा खून केला. नंतर त्याचा मृतदेह धुतला व परिसरातील एका खड्ड्यात फेकला. खोलीतील रक्त पुसून पुरावा नष्ट केला. शनिवारी दुपारी येथेच काम करणारा युवक आला. त्याला गब्बर खड्ड्यात पडलेला दिसला. त्याने दोघांकडे विचारणा केली. 'गब्बर झोपला आहे', असे त्यांनी युवकाला सांगितले. युवकाला संशय आला. त्याने राणा यांना माहिती दिली.

## विशेष पथकाने केली अल्पवयीन मुलीची सुटका

औरंगाबाद : अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याची घटनेची माहिती मिळाल्यानंतर, एएचटीसीयू (अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष) विशेष पथकाने प्रेमीयुगलाचा पाठलाग करून अल्पवयीन मुलीची सुटका केली.



तसेच, या मुलीला पळवून नेणाऱ्या अक्षय साहेबराव पवार (२२) याला विशेष पथकाने एमआयडीसी वाळूज पोलिसांच्या हवाली केले. एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्याअंतर्गत एक अल्पवयीन मुलीला पळविल्याची घटना नोंदविण्यात आली होती.

गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून, दोघांनाही ताब्यात घेण्यात आले.

ही कारवाई पोलिस आयुक्त डॉ. निखील गुप्ता, उपायुक्त मिना मकवाना यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पोलिस उपनिरीक्षक स्नेहा करेवाड, महिला पोलिस अंमलदार हिरा चिंचोलकर, मोहिनी चिंचोळकर, पोलिस अंमलदार ईश्वरसिंग कहाटे, साबळे, गणेश पंडुरे यांनी ही कारवाई यशस्वी केली.

## दादर रेल्वे पोलीस ठाणे विशेष पोलीस पथकाची कामगिरी



दादर : दिनांक ७/७/२०२१ रोजी दादर रेल्वे पोलीस ठाणे येथे एकूण १,००,००० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला याचा गुन्हा नोंदवण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास करण्याकरिता वरिष्ठांच्या आदेशानुसार विशेष पथक नेमण्यात येवुन दादर रेल्वे स्टेशन परिसरात नमूद गुन्हयाच्या अनुषंगाने तपास करण्यात येत होता . त्यावेळी तपासादरम्यान एक इसम संशयीतरित्या फिरत असतांना आढळून आला . त्याच्याकडे चौकशी केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देऊ लागला तपासादरम्यान आरोपी आहे हार्ड कोअर असल्याने वारंवार दिशाभूल करणारी माहिती पोलिसांना देत होता. तपासादरम्यान त्याच्या ताब्यात एक संशयीत चावी मिळाली त्यानुसार तो ग्रँड रोड येथील अप्पर स्टे गेस्ट हाऊस या लॉज वर राहत आहे हे निष्पन्न झाले . आरोपी चे नाव : जाहीर जमाल शेख वय : २० रा. प्लॅट नं . ३२, बेलासीस रोड , मुंबई सेंट्रल , मूळ गाव : बावन्न विगा , पश्चिम बंगाल,

सदर आरोपीची कसून चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबूल केला . आरोपी हा पश्चिम बंगाल चा ...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र

मुंबई

मुंबई, मंगळवार २० ते २६ जुलै २०२१



# खरेदीसाठी गेलेल्या महिलेच्या बॅगमधून सोन्याचे दागिने लंपास; गुन्हा दाखल



नागपूर : महाल परिसरात खरेदीसाठी गेलेल्या महिलेच्या बॅगमधून ६० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास करण्यात आले. ही घटना २३ जूनच्या सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास घडली. शोभा अशोकराव भापकर (वय ६७, रा. वर्धा) असे फिर्यादीचे नाव आहे. त्या सध्या गणेशपेठ परिसरात रजत संकुल येथे वास्तव्यास आहेत. भापकर २३ जूनला महालातील केळीबाग रोडवर खरेदीसाठी गेल्या होत्या. त्यावेळी चोरट्याने त्यांची नजर चूकवून त्यांच्य बॅगमधून सोन्याचे दागिने लंपास केले. त्यानंतर त्या घरी परतल्या व बॅग तशीच ठेवली होती. नंतर काही दिवसांनी त्यांनी बॅग तपासली असता त्यांना दागिने दिसले नाहीत. त्यांनी पोलिसांत तक्रार दिली. कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# पुणे ∙ युवतीला पळवून नेल्याच्या रागातून प्रियकरासह दोघांचा खून; परिसरात खळबळ

युवतीला पळवून नेल्याच्या रागातून प्रियकरासह दोघांचा काठ्या व लोखंडी रॉडने बेदम मारहाण करून खून केल्याचा खळबळजनक प्रकार खेड तालुक्यातील करंजविहिरे गावात घडला. या प्रकरणी नऊ जणांना चाकण पोलिसांनी अटक केली आहे.




पुणे) अशी खून झालेल्या कामगारांची नावे आहेत. वीटभट्टी मालक आणि त्याच्या आठ साथीदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यात मयत बाळू गावडे याच्या पत्नीचाही समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खेड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात करंजविहिरे गावात हॉटेल 'माणुसकी'समोर मालक बाळू मरगज यांची वीटभट्टी आहे. या ठिकाणी बाळू आणि राहुल गावडे कामाला होते. यापैकी बाळू विवाहित होता. त्याला दोन अपत्येही आहेत. वीटभट्टी मालकाच्या २१ वर्षीय मुलीच्या तो प्रेमात पडला. त्याने तिच्यासमवेत पळून जाण्याचा निर्णय घेतला. बाळूने युवतीसह १५ जुलैला पळून जाण्याचे ठरविले. त्यासाठी राहुलची मदत घेतली. राहुलने दोघांना खोपोलीला सोडले. तरुणी पळून गेल्याचे तिच्या नातेवाइकांना समजताच शोध सुरू झाला. यात राहुलही होता. हा प्रकार लक्षात आल्यानंतर दोन दिवसांनी बाळू आणि राहुल या दोघांनाही हॉटेलमध्ये आणण्यात आले. लाकडी काठी आणि लोखंडी रॉडने दोघांना बेदम मारहाण केली. त्यात दोघांचा मृत्यू झाला. त्यानंतर युवतीच्या नातेवाइकांनी घटनास्थळावरून पळ काढला.

मृतदेहांवरून संशय

मारहाण केल्यानंतर युवतीच्या नातेवाइकांपैकीच एकाने थेट पोलिसांना फोन करून हॉटेलमध्ये दोन मृतदेह असल्याची माहिती दिली. मात्र, पोलिसांना मृतदेह संशयास्पद वाटल्याने माहिती देणाऱ्या आरोपीकडे चौकशी केली. त्यात या दुहेरी खुनाचा उलगडा झाला. या प्रकरणी मरगज यांच्यासह नऊ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, चौकशी सुरू आहे.

# नागपुरात रोजगार नसल्याच्या नैराश्यातून बेरोजगार तरुणाने केली आत्महत्या



नागपूर : लॉकडाउनमुळे मिळकतीवर, रोजगारावर फरक पडला, त्यातच पत्नीशी वाद सुरू झाल्याने एकाने गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना तहसील पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गोळीबार चौक परिसरात घडली.

रोहित क्रिष्णराव वऱ्हाडे (वय ३२) असे या तरुणाचे नाव आहे. रोहितचा सीताबर्डी परिसरात कापडाचा छोटा व्यवसाय होता. लॉकडाउन दरम्यान त्याच्या रोजगारावर फरक पडला.

काही दिवसांपासून त्याचा पत्नीशी वादही सुरू होता.

गेल्या काही दिवसांपासून निराश असल्याने त्याने यापूर्वीसुद्धा दोनवेळा आत्महत्येचा प्रयत्न केला होता.

गुरुवारी त्याने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

# लग्नाच्या आमिषाने तरुणीवर बलात्कार; आरोपीला अटक




पिंपरी : लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणाने तरुणीवर वारंवार तिच्या मर्जीविरोधात जाऊन शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर लग्नास नकार दिला. यामुळे तरुणीने विषारी औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यानंतर तरुणाने त्या दोघांमधील फोटो, मेसेज, रेकॉर्डिंग डिलिट केले. तरुणीने लिहिलेली डायरी लपवली.

याबाबत तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तरुणाला बेड्या ठोकल्या आहेत. अविनाश भांगे (वय २७, रा. नखाते वस्ती, काळेवाडी, पिंपरी) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत पीडितेने गुरुवारी (१४ जुलै) भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार जून २०१९ ते १३ जुलै २०२१ या कालावधीत मळवली स्टेशन, लोणावळा येथे एका लॉजवर, पीडित तरुणीच्या घरी आणि हिंजवडीतील हॉटेल ट्वीन्स टॉवर लॉजिंग येथे घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अविनाशने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवले. त्यानंतर तरुणीच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तरुणीला शिवीगाळ, दमदाटी करून मारहाण केली.

# धक्कादायक! नाशिकमध्ये मित्र-मैत्रिणीस मारहाण करुन लूट

कारमध्ये प्रवासी म्हणून बसवून घेतलेल्या मित्र-मैत्रिणीस मारहण करून त्यांच्याकडील रोख रक्कम आणि तीन मोबाइल फोन असा ५० हजार रुपयांचा मुद्देमाल संशयितांनी लुटल्याचा धक्कादायक प्रकार बुधवारी पहाटेच्या सुमारास शिंदे गाव ते वडाळागावाच्या दरम्यान घडला.

लुटारूंनी लोखंडी हातोडीने डोक्यात प्रहार केल्याने जखमी झालेले मोहम्मद नबीहसन अन्सार (वय २४, हल्ली रा. वडाळा गाव, मूळ उत्तर प्रदेश) यांनी या घटनेनंतर नाशिकरोड पोलिस ठाण्यात संशयित गोल्ड्या (पूर्ण नाव माहीत नाही) आणि त्याच्या साथीदारांविरोधात फिर्याद दिली. वडाळा गावात गादीचा कापूस बनविण्याच्या कारखान्यात काम करणारा मोहम्मद अन्सार हा चुकून लागलेल्या फोनवरून ओळख झालेली मैत्रीण आफरीनसोबत शिंदे येथे मनू मिश्रा नावाच्या तिच्या भावाला भेटायला रिक्षाने मंगळवारी रात्री आठ वाजता गेला होता. शिंदे येथे साडेनऊ वाजता पोहोचल्यावर अंधाराचे कारण देत आफरीनने भावाच्या घरी जाणे रद्द करून हॉटेलवर जेवणाचा आग्रह धरला. काही हॉटेल्सवर त्यांनी जेवणाची चौकशी केली. परंतु, जेवण न मिळाल्याने त्यांनी नाशिकला




जाण्याचे ठरविले. रिक्षाने नाशिकला जाण्याऐवजी आफरीनने महामार्गाच्या कडेला उभ्या पांढऱ्या रंगाच्या कारने नाशिकला जाऊ, असे सांगितले. ही कार ठरवून त्याद्वारे ते महामार्गाने थोडे पुढे आल्यावर रस्त्यात भेटलेल्या तीन युवकांना चालकाने कारमध्ये बसवून घेतले. पुढे गेल्यावर या युवकांनी चालकाशी वाद घातला आणि जिथून आणले तिथेच पुन्हा सोड, असा आग्रह धरल्यावर चालकाने कार मागे वळविली. अन्सारने नाशिकला सोडण्याचा आग्रह धरताच पाठीमागील सीटवरील युवकाने त्याच्या डोक्यात लोखंडी हातोडीने प्रहार केला.

एकाने अन्सारच्या डोळ्यांवर कापड बांधले आणि सीटच्या खाली पालथे झोपवले. त्याच्याकडील मोबाइल आणि खिशातील सात हजार रुपये बळजबरीने काढून घेतले.

# सोनसाखळी चोरांचा उच्छाद; एकाच दिवसात घडल्या जबरी चोरीच्या ४ घटना

शहरात एकाच दिवसात जबरी चोरीच्या चार घटना घडल्या असून, लॉकडाउन काळात थंडावलेल्या सोनसाखळी चोरीच्या घटना आता पुन्हा वाढू लागल्या आहेत. कर्वेनगर येथे एका महिलेचे मंगळसूत्र आणि खडकी बाजार येथे एक मुलीची सोनसाखळी हिसकावून नेण्यात आली.



सोनसाखळी आणि मोबाइल हिसकावून नेण्याच्या घटना गेल्या काही दिवसांत वाढत आहेत. गुरुवारी एका दिवसात शहरात अशा प्रकारच्या चार गुन्ह्यांची नोंद आहे. त्यामधील दोन गुन्हे सोनसाखळी हिसकावण्याचे आहेत. कर्वेनगर येथे एक ४७ वर्षीय महिला गुरुवारी रात्री सव्वाआठ वाजण्याच्या सुमारास औषधे आणण्यासाठी पतीसोबत पायी निघालेल्या असताना, दुचाकीवरून आलेल्या एका व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील अंदाजे एक लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र हिसकावून नेले. याप्रकरणी वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसरी घटना खडकी बाजार येथील भाजी मंडईजवळ घडली. एका ५१ वर्षीय महिलेची मुलगी दुकानात खरेदी करीत होती. त्या वेळी ती महिला नातीला कडेवर घेऊन दुकानाबाहेर थांबली होती. तेव्हा तेथून पायी चाललेल्या एका तरुणाने नातीच्या गळ्यातील अंदाजे ७६ हजार रुपये किमतीची सोनसाखळी हिसकावली. महिलेने आरडाओरडा केल्यानंतर बाजारपेठेतील नागरिकांनी चोराला पकडले. पोलिसही तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आरोपीला अटक केली. हंबीरराव सुकाळे (वय २८, रा. भोसरी) असे सोनसाखळी चोराचे नाव आहे, ही माहिती उपनिरीक्षक प्रताप गिरी यांनी दिली.

रिक्षाचालकाला लुटले

पुणे स्टेशन परिसरात रस्त्याच्या कडेला रिक्षा उभी करून मोबाइलवर बोलत थांबलेल्या रिक्षाचालकाला दोघा अनोळखी व्यक्तींनी मारहाण करून लुटल्याचा प्रकार गुरुवारी सकाळी ११ ते पावणेबाराच्या सुमारास घडला. आरोपींनी रिक्षाचालकाच्या डोळ्यात बोट घातले, बरगडीला जोराचा चावा घेऊन जखमी केले. या प्रकरणी अतुल महादेव लोंढे (वय ३८, रा. अप्पर इंदिरानगर) यांनी बंडगार्डन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

तृतीयपंथीयाने हिसकावला दुचाकीस्वाराचा मोबाइल

साधू वासवानी चौक येथून दुचाकीवरून घरी चाललेल्या व्यक्तीला थांबवून एका तृतीयपंथीयाने त्यांचा मोबाइल आणि खिशातील एक हजार रुपये हिसकावून नेल्याचा प्रकार रात्री साडेदहाच्या सुमारास घडला.

या प्रकरणी कासेवाडी (भवानी पेठ) येथे राहणाऱ्या एका ४८ वर्षीय व्यक्तीने फिर्याद दिली. त्यावरून अनोळखी तृतीयपंथीयावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, शहरातील बऱ्याच सिग्नलला तृतीयपंथीय वाहनचालकांकडून पैसे वसूल करीत असल्याचे चित्र आहे.

पृष्ठ १ वरुन

## मुंबईत पावसाचा 'हाय अलर्ट',

रहिवाशांना कोणत्याही परिस्थितीत बाहेर काढून त्यांना स्थलांतरित करा, असंही मुख्यमंत्र्यांना सांगितलं.

सर्वच यंत्रणांनी बचाव पथके तयार ठेवावीत व आपापल्या नियंत्रण कक्षांना एकमेकांशी सातत्याने संपर्कात राहण्यास सांगावे. कोविड केंद्र व फिल्ड रुग्णालयांतील डॉक्टर्स व वैद्यकीय पथकांना देखील मदतीसाठी तयार ठेवावे. अर्धवट बांधकामे, मेट्रोची व इतर कामे यामधून भरपूर पाऊस झाल्यास पाणी साचून दुर्घटन होऊ नये तसेच त्यानंतरही त्या ठिकाणी पाणी साचलेले राहून मलेरिया, डेंग्यू, लेप्टो सारखे रोग पसरवू नये म्हणून विशेष काळजी घ्यावी व पाण्याचा निचरा लगेच होईल हे पाहावे, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

हवामान विभागाचा ऑरेंज इशारा

हवामान विभागाचे जयंता सरकार म्हणाले की, 'मुंबई व कोकण किनारपट्टीसाठी पुढील पाच दिवस ऑरेंज अलर्ट असून ५० ते ६० किमी प्रती तास या वेगाने वारेही वाहतील. २३ ताराखेस देखील संभाव्य कमी दाबाच्या पट्ट्यामुळे जोरदार पाऊस होऊ शकतो.

## करोना परिस्थिती

आली होती. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शहरामध्ये सक्रिय करोना रुग्णांची संख्या एक हजाराच्या आतमध्ये होती. ७ जुलैनंतर शहरात रुग्ण संख्या वाढू लागली आणि त्यानंतर सक्रिय रुग्णांची संख्या एक हजारांच्या पुढे गेली. सलग तीन दिवस हा आकडा कायम होता. यामुळे शहराची चिंता वाढली होती. रुग्ण संख्येत अचानकपणे वाढ झाल्याने प्रशासनही सतर्क झाले होते. करोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना करण्यास सुरुवात केली होती, परंतु तीन दिवसांनंतर पुन्हा रुग्ण संख्या कमी होऊ लागली. आता शहरात नऊशेच्या आसपास सक्रिय रुग्ण आहेत, तर शहरात दररोज ९० ते ९६ च्या आसपास रुग्ण आढळून येत आहेत. दिवसाला एक ते दोन मृत्यूची नोंद होत आहे.

## ठाण्यात 3 दिवसांपासून पावसाचा कहर

जांभळी नाका, पिसे, मानपाडातील काही भाग आणि ठाणे पश्चिम बाजारपेठ देखील पाण्याखाली गेली आहे. तसेच ठाणे शहराला लागून असलेला शिळ डायघर महामार्गदेखील पाण्याखाली गेला आहे. मागील तीन दिवसांपासून हा महामार्ग पाण्याखाली आहे. त्यामुळे रस्त्यावर लांबच्या लांब गाड्यांच्या रांगा लागल्या आहेत. तसेच अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचल्यानं वाहतूकीचे मार्ग बदलण्यात आले आहेत. पण मार्ग बदलल्यानं अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाल्याचं चित्र आहे.

त्याचबरोबर, दिवा शिळ चौक ते मुंब्रा खान कम्पाउंडपर्यंत संपूर्ण महामार्ग पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे मागील बऱ्याच काळापासून याठिकाणी वाहतूक सेवा ठप्प झाली आहे. अजूनही ठाणे शहरात पावसाचा जोर वाढत असून असाच पाऊस सुरू राहिल्यास 26 जुलै 2005 सारखी परिस्थिती उद्भवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या मुंब्रा शहराच्या रहिवाशी भागातही पावसाच्या पाण्याच प्रमाण वाढू लागलं आहे. त्यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यताही वाढत आहे.

भारतीय हवामान विभागानं जारी केलेल्या माहितीनुसार, मागील चोवीस तासांत ठाणे जिल्ह्यात विक्रमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. एकट्या उल्हासनगर परिसरात तब्बल 400 मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. तर त्यापाठोपाठ शहापूर 200 मिमी, कल्याण-180 मिमी, भिवंडी- 155 मिमी आणि मुरबाड याठिकाणी 56 मिमी पाऊस कोसळला आहे.

## दादर रेल्वे पोलीस ठाणे

असून तो मुंबई शहरात येवून लॉज वर राहतो व मुंबई मधील वेगवेगळ्या रेल्वे रेल्वे स्टेशन वर व रेल्वेत रात्रीच्या वेळेस बॅगा चोरण्याचं काम ठराविक दिवस करीत असून परत आपल्या मूळ गावी जात असे . आरोपी याने वरील गुन्ह्या व्यतिरिक्त सीएसमटी येथून दोन लॅपटॉप असणाऱ्या बॅगा चोरल्याची कबुली दिली . त्यास अनुसरून दादर रेल्वे पोलीस ठाणे मधील चोरीस गेलेल्या एकूण ०४ मोबाईल फोन पैकी एक मोबाईल फोन व सीएसएमटी रेल्वे स्टेशन येथून चोरलेले दोन लॅपटॉप हस्तगत करण्यात आलेले आहेत .आरोपी तपासात पोलिसांना सहकार्य करीत नाही तसेच वारंवार दिशाभूल करणारी माहिती देत असल्याने मुंबई शहरातील सर्व पोलीस ठाण्यांनी त्याच्या दाखल असणाऱ्या गुन्हयाचे सीसीटीव्ही फुटेज पडताळून खात्री करण्याबाबतचे व आरोपी सध्या दादर रेल्वे पोलीस ठाणे चे पोलीस कस्टडीत असल्याने त्याच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन वपोनि काटकर यांनी केलेले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त , लोहमार्ग मुंबई , पोलीस उपआयुक्त मध्य परिमंडळ लोहमार्ग मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर काटकर , पोलीस निरीक्षक पोवार , पो. नि. पाटील, सपोनि , घनवट यांच्या सूचनेनुसार गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोहवा भडाळे , पोहवा हरिचंद्रे , पोहवा शिंदे, पोना . टिंगरे ,पोना पवार, पोना, खैरनार , ,पो शि . आरकड, पो शि. तांबोळी , माळी यांनी पार पाडली .

## अननस, फणसाच्या

रवानगी करण्यात आली आहे. केंद्रीय महसूल गुप्त वार्ता संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी १,८७८ किलो गांजा तस्करीप्रकरणी या सहा जणांना शुक्रवारी जेरबंद केले होते. त्यांना शनिवारी न्यायालयात हजर करण्यात आले. गांजा आणण्यात आरोपी धर्मराज शिंदेची मुख्य भूमिका असल्याने पुढील तपासासाठी त्याला कोठडी देण्याची मागणी विशेष सरकारी वकील संदीप घाटे यांनी केली. त्यावर आरोपी धर्मराजने तपासात या प्रकरणाच्या मुख्य सूत्रधाराचे नाव सांगितले असून, त्याला कोठडी देण्याची गरज नाही, असा दावा बचाव पक्षातर्फे करण्यात आला. कोर्टाने विशेष सरकारी वकिलांचा युक्तिवाद मान्य करून आरोपी धर्मराज शिंदे याला 'डीआरआय' कोठडी सुनावली. अननस, फणसाच्या गोण्यातून गांजा तस्करी ही शहरातील आतापर्यंतची सर्वांत मोठी गांजा तस्करी उघडकीस आली असून, आरोपींनी अननस व फणसाच्या गोण्यांमध्ये फळांखाली गांजा लपवून ठेवला होता. हा गांजा जप्त करण्यात आला असून, त्याचे मूल्य अंदाजे पावणेचार कोटी असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

## अल्पवयीन मुलांना घरात

मिळाली होती. झारखंडमधून कंत्राटदारांनी ही अल्पवयीन मुले आणली होती. जितू व कार्तिक नावाच्या कंत्राटदारांनी त्यांना कोंडून ठेवले होते. त्यांना जेवण दिले आणि पगारदेखील दिला जात नाही, अशी तक्रार नागपूर येथील 'डीसीपीओ'कडे आली होती. ती वर्ध्याच्या बाल संरक्षण कक्षाकडे पाठविण्यात आली. बाल संरक्षण कक्षाने यात पुलगाव पोलिसांच्या मदतीने मुलांची सुटका केली. सर्व मुलांची प्रकृती ठीक असून, ती सुरक्षित आहेत.

# राजकुमार हिराणींच्या मुलाच्या नावे इन्स्टाग्रामवर बनावट प्रोफाइल

अंधेरी : प्रसिद्ध दिग्दर्शक राजकुमार हिराणी यांच्या कंपनीच्या आणि मुलाचे नावाने सोशल मीडियावर प्रोफाइल तयार करून लोकांची फसवणूक केली जात असल्याचे समोर आले आहे. जाहिरात, चित्रपटांमध्ये भूमिका देतो सांगून इच्छुकांकडून माहिती मागविण्यात येत होती. हा प्रकार लक्षात येताच हिराणी यांच्या कंपनीमार्फत अंधेरी पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे. राजकुमार हिराणी यांची आर. एच. फिल्मस् या कंपनीमध्ये भागीदारी असून या कंपनीच्या माध्यमातून त्यांनी अनेक चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. कंपनीच्या ईमेल आयडीवर एका



अनोळखी व्यक्तीचा ईमेल आला. राजकुमार हिराणी यांचा मुलगा कबीर हिराणी यांच्या नावाने इन्स्टाग्रामवर एक प्रोफाइल तयार करण्यात आले असून त्याआधारे हिराणी यांच्या आगामी तीन चित्रपटांची जाहिरात केली जात आहे. तीन चित्रपट तसेच काही जाहिरातींचे लवकरच चित्रिकरण सुरू करण्यात येणार असून,

संपादकीय...



# दुसऱ्या लाटेनंतरचे अधिवेशन

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनावेळी जे प्रश्न होते, ते आजपासून (१९ जुलै) सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनातही आहेत. पण गेल्या वेळी त्याकडे लक्ष देण्यास कोणाला वेळ नव्हता. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या प्रचारासाठी खासदारांना आपापल्या राज्यांत जायचे होते; त्यांनी अधिवेशन गुंडाळायला लावले होते. तसेही कुठल्याही महत्त्वाच्या विषयावर संसदेच्या सभागृहांमध्ये चर्चा करण्याची सत्ताधारी पक्षाची तयारी नसते. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशन पूर्णवेळ झाले नाही ही बाब भाजपच्या पथ्यावरच पडली. विरोधकांनी लोकसभेत दिलेला एकही स्थगन प्रस्ताव लोकसभाध्यक्षांनी स्वीकारला नाही आणि त्यावर चर्चा केली नाही. आता पावसाळी अधिवेशनात विरोधक उरलीसुरली ताकद घेऊन मुद्द्यांवर बोलतात का, याकडे सुज्ञांचे लक्ष असू शकेल. सत्ताधारी या वेळी अधिवेशन पूर्णवेळ सुरू ठेवण्याच्या मन:स्थितीत दिसताहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल करून नवा चमू बनवला आहे. नव्या मंत्र्यांच्या माध्यमातून केंद्रीय नेतृत्वाच्या कथित 'निर्णयक्षमते'ची बाजू सावरून



घेतलेली पाहायला मिळेल. विशेषत: आरोग्य आणि शिक्षणविषयक मुद्द्यांवर संबंधित मंत्र्यांकडून दिली जाणारी स्पष्टीकरणे, भाषणे-उत्तरांकडे लक्ष ठेवावे लागेल. वादग्रस्त विषयांवर विरोधकांशी समन्वय साधण्याचे काम राज्यसभेतील नेते पीयूष गोयल यांच्याकडे देण्यात आले आहे. शिवाय संरक्षणविषयक मुद्द्यांवर, विशेषत: चिनी संघर्षांवर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ए. के. अ‍ॅण्टोनी यांच्याशी संवाद साधला आहे. पवार आणि अ‍ॅण्टोनी दोघेही माजी संरक्षणमंत्री आहेत, त्यांची या विषयावरील संसदेतील विधाने महत्त्वाची ठरू शकतात. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून सहकारमंत्री म्हणून होणारे भाष्यही राज्यांमधील राजकारणाची दिशा दाखवू शकते. मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यांसह सहकार क्षेत्रातील केंद्राच्या संभाव्य गळचेपीवर शिवसेना आक्रमक होईल तेव्हा सत्ताधाऱ्यांकडून कोणता प्रतिसाद मिळतो, हेही पाहण्याजोगे असू शकेल.

पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीनंतर होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात चर्चेचा प्रमुख मुद्दा करोना हाच असायला हवा. करोनाच्या दुसऱ्या लाटेच्या हाताळणीवरून उच्च न्यायालये, सर्वोच्च न्यायालय यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उभे केले होते. करोनासंदर्भातील केंद्रीभूत धोरण आणि त्याच्या अपयशांची विविध मुद्द्यांच्या आधारावर चर्चा करता येणे शक्य आहे. दुसऱ्या लाटेचा अंदाज का आला नाही, त्याची पूर्वतयारी का केली गेली नाही, प्राणवायू पुरवठ्याच्या मुद्द्याकडे का दुर्लक्ष केले गेले, लसीकरणाच्या धोरणात धरसोड वृत्ती का दाखवली, लसखरेदीत दिरंगाई का केली.. असे अनेक प्रश्न केंद्र सरकारला विचारले जाऊ शकतात. करोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे मोदी सरकारच्या निर्णयप्रक्रियेतील त्रुटी पहिल्यांदाच लोकांसमोर आल्या. आता या त्रुटींवर संसदेत सखोल चर्चा होण्याची गरज आहे. केंद्र सरकारची कोंडी करणारा करोनाचा मुद्दा विरोधक कसा उपस्थित करतात, यावर अधिवेशनातील सूर निश्चित होईल.

शेतकरी दिल्लीच्या वेशींवर अजूनही आंदोलन करत आहेत. तीनही वादग्रस्त कायदे केंद्राने मागे घ्यावेत, या मागणीसाठी संसद मार्गावर येऊन आंदोलन करण्याचे शेतकऱ्यांनी ठरवले असले, तरी त्यांना तिथपर्यंत येऊ दिले जाण्याची शक्यता कमी दिसते. दिल्लीत येण्याची पोलिसांनी परवानगी दिली तरी त्यांच्यावर अटी-शर्ती लादल्या जातील. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने राज्यात या कायद्यांसंदर्भातली भूमिका मवाळ केलेली दिसली. राज्यामध्ये केंद्राने संमत केलेल्या शेती कायद्यांत बदल करून विधानसभेत विधेयके मांडली गेली. विधेयकांचा मसुदा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपसमितीने तयार केला असला तरी, यासंदर्भातील चर्चा, विचारविनियम करण्याची प्रमुख जबाबदारी काँग्रेसचे नेते तसेच महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्यावर होती. त्यामुळे काँग्रेसच्या सहमतीने राज्यात शेतीविषयक विधेयके मांडली गेली आहेत. त्यामुळे काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्व कायदे रद्द करण्याच्या पूर्वीच्या भूमिकेवर कायम राहते का, हेही पाहावे लागेल.

काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी 'राफेल'च्या कथित गैरव्यवहारांवरून पंतप्रधान मोदी तसेच भाजपला लक्ष्य बनवले होते. या प्रकरणावरून फ्रान्समध्ये चौकशी सुरू झालेली आहे. खरे तर काँग्रेससाठी हा अग्रक्रमाचा विषय असायला हवा. काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी पक्षनेत्यांच्या बैठकीत इंधन दरवाढ, बेरोजगारी या विषयांसह 'राफेल'चा मुद्दाही अजेण्ड्यावर घेण्याची सूचना केलेली आहे. त्यामुळे राहुल गांधी आणि त्यांचा लोकसभेतील चमू किती आक्रमक होतो, हेही सभागृहात दिसेल.

# या घुसखोरीचे काय?

गेल्या आठवड्यातील दोन घटना भारतीयांची सामरिक आणि आर्थिक निरक्षरता यांचे कटू स्मरण करून देणाऱ्या आणि म्हणून वेदनादायी ठरतात. यातील पहिल्या घटनेत भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी चीनचे परराष्ट्रमंत्री वँग यी यांच्याकडे केलेल्या तक्रारीची नोंद घ्यायला हवी. हे दोघे अन्य काही जागतिक नेत्यांसह ताजिकिस्तानची राजधानी दुशांबे येथे 'शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन'च्या बैठकीत भेटले. या जागतिक मंचावर जयशंकर यांना चीनसमोर आपली समस्या मांडावी लागली, म्हणजे ही वेदना किती तीव्र असेल ते लक्षात येईल. ''भारत आणि चीन यांतील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर एकतर्फी झालेले बदल भारतास अस्वीकार्ह आहेत,'' असे जयशंकर यांनी यी यांना सुनावले. यामुळे काही विचारांधळ्यांस भारतीय परराष्ट्रमंत्र्यांनी चीनला ठणकावले असे वाटून आनंद होईल. तथापि, यात सीमावर्ती भागात झालेल्या 'एकतर्फी' बदलाची कबुली आहे, हे सत्य लक्षात घ्यायला हवे. याचा अर्थ चीनने आपल्या शेजारी देशाची, म्हणजे भारताची, काहीही पत्रास न ठेवता प्रत्यक्ष सीमारेषेवर बदल केले. जयशंकर यांच्या राजनैतिक कडबोळी भाषेचा सरळ अर्थ असा की, चीनने आपली भूमी हडप केली. हे अनेकांस वाटते त्यानुसार असत्य असते, तर एकतर्फी बदलाचा मुद्दाच उपस्थित झाला नसता. इतकेच नाही, तर ''चीनच्या या कृतीने उभय देशांतील संबंधांवर नकारात्मक परिणाम झालेला आहे'' हे सत्यदेखील जयशंकर नमूद करतात. म्हणजेच गेल्या वर्षी जून महिन्यात सीमारेषेवर गलवान खोऱ्यात जे काही घडले, त्यात चीनने भारतीय भूमीत घुसखोरी केली हे सत्य पुन्हा एकदा समोर येते.

दुसरा मुद्दा यानंतर चीनविरोधात समस्त भारतवर्षात दाटून आलेल्या संतापाचा. चीन आपल्याशी इतक्या दुष्टपणाने, कुटिल राजकारण करीत असताना आपले त्या देशाशी संबंध सुरळीत राहूच शकत नाहीत, हे त्या वेळी ठसठशीतपणे सांगितले गेले. त्याची गरज होतीच. त्यामुळे चिनी वस्तूंवर बहिष्कारादी अस्त्राचा वापर किती अपरिहार्य आहे हे दिसून आले. चिनी वस्तूंवर बहिष्कार, चिनी कंपन्यांस भारतात प्रवेश दुरापास्त करण्यासाठी विविध उपाय, चिनी दूरसंचार कंपन्यांस भारतीय बाजारपेठेत अडथळे उभारणे येथपासून ते पोराटोरांत लोकप्रिय असलेल्या 'टिकटॉक' या टाइमपासवर बंदीपर्यंत अनेक उपाय योजले गेले. आर्थिक निरक्षरतेच्या अज्ञानडोहात डुंबण्यात आनंद मानणाऱ्या कोट्यवधी नागरिकांनी या सर्व उपायांचे मन:पूर्वक स्वागत केले आणि आपापल्या घरातील चिनी दिव्यांच्या माळा विझवून टाकल्या. तेही योग्यच. त्यानंतर चीनला आपण कसे रोखले, नाक दाबल्यामुळे त्या देशास तोंड कसे उघडावे लागले वगैरे बढायांत आपल्यातील अनेक रममाण झाले. तथापि, अशा सर्वास अत्यंत हृदयद्रावक ठरेल असा तपशील गेल्याच आठवड्यात उपलब्ध झाला. दुशांबे येथे जयशंकर हे चीनसमोर अत्यंत मृदू शब्दांत आपली नाराजी व्यक्त करीत असताना, त्याच वेळी जाहीर झालेल्या या तपशिलामुळे आपली चिनी जखम पुन्हा वाहती होण्याचा धोका संभवतो.

कारण हा तपशील आहे गेल्या वर्षभरात चीनकडून भारतात होणाऱ्या आयातीत किती लक्षणीय वाढ झाली, हे दाखवून देणारा. आत्मनिर्भरता, चिनी वस्तूंवर बहिष्कार आदी टाळ्याखाऊ वल्गना केल्या जात असताना, प्रत्यक्षात गेल्याच्या गेल्या वर्षांपेक्षा गेल्या आर्थिक वर्षांत चीनची भारतातील आयात चक्क दुप्पट झाली. अनेक अर्थविषयक दैनिकांनी या आयात-निर्यातीचा साद्यंत तपशील प्रसृत केला आहे. तो डोळे उघडणारा ठरतो. उदाहरणार्थ, एप्रिल २०२१ मध्ये चीनमधून भारतात तब्बल ६५१ कोटी डॉलर्सची आयात झाली. ती त्याआधीच्या वर्षांपेक्षा ११४ टक्क्यांनी अधिक आहे. २०२० सालच्या एप्रिल महिन्यात चीनमधून साधारण ३०० कोटी डॉलर्सच्या विविध वस्तू भारतीय बाजारात आल्या. इतकेच नव्हे, तर याच महिन्यात भारतात आयात झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंतील ४०.७१ टक्के साधनसंपत्ती ही एकट्या चीनमधून आली. त्याआधीच्या तीन वर्षांत हे प्रमाण साधारण ३३ टक्क्यांच्या आसपास होते. भारतातील इलेक्ट्रॉनिक वस्तू, विविध उपकरणांचे सुटे भाग आदीत चीनचा वार्षिक वाटा १६.५३ टक्क्यांवर गेला आहे. ही गेल्या १२ वर्षांतील उच्चांकी आयात. याच्या बरोबरीने व्हॅक्युम क्लीनर्स, ओव्हन आदी वस्तू वा त्यांच्या निर्मितीतील सुटे भाग हे प्रचंड प्रमाणावर अजूनही चीनमधूनच येतात. म्हणजे भारतीयांची घरे चिनी बनावटीच्या साधनांनी स्वच्छ होतात आणि



आपले अन्न त्याच देशाने विकसित केलेल्या ओव्हनमधून गरम होऊन आपल्या ताटात येते. या संपूर्ण २०२०-२१ वर्षांत चिनी वस्तूंवर भारतीयांचा बहिष्कार वगैरे असताना प्रत्यक्षात चिनी आयातीचे प्रमाण ५२ टक्क्यांवर गेले, जे त्याआधीच्या वर्षांत ४४ टक्के इतके होते. त्यातही आवर्जून लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे, या घरगुती वस्तूंच्या जोडीला संगणक, प्रिंटर्स, त्यांचे सुटे भाग चीनमधून येण्याच्या प्रमाणातही घसघशीत वाढ झाली. आजमितीस या बाजारपेठेतील निम्मा वाटा एकट्या चीनचा आहे. तीच बाब दूरसंचार क्षेत्राचीही. आपल्या क्रिकेट सामन्यांस चिनी प्रायोजक जसा आपण गुमान स्वीकारला, त्याचप्रमाणे यातील चीनचे प्रभुत्वदेखील तितक्याच मुकाटपणे मान्य केले असे उपलब्ध आकडेवारीवरून दिसते. यातही चिनी उत्पादनांचा वाटा ४४ टक्क्यांच्या आसपास आहे. हे सर्व फक्त इलेक्ट्रॉनिक वस्तू आदींबाबत. यात औषधे आणि रसायने यांचा अंतर्भाव नाही. घाऊक औषध-घटकनिर्मितीच्या (बल्क ड्रग्ज) क्षेत्रात आज चीनचा हात धरणारा कोणी नाही, हे विसरता नये. या क्षेत्रात चीनने इतक्या प्रचंड प्रमाणावर आपला क्षमताविस्तार केलेला आहे, की त्यांची उत्पादने घेण्यास दुसरा पर्याय नाही. याचा अर्थ असा की, आपल्या जगण्याचे एकही क्षेत्र असे नाही की ज्यावर चिनी बाजारपेठेचा कब्जा नाही.

अशा वेळी केवळ फुकाच्या घोषणा आणि पोकळ शड्डूठोक यामुळे स्थानिक भाबड्या जनांचे मनोरंजन तेवढे होईल. पण चीनच्या आर्थिक साम्राज्याच्या केसालाही धक्का लागणार नाही. हे अत्यंत कटू असले तरी सत्य आहे. अशा वेळी राणा भीमदेवी थाटाच्या बडबडीपेक्षा धोरणात्मक उपाय योजणे आवश्यक आहे. हे कसे करायचे असते हे चीनच दाखवून देतो.

इतक्या वर्षांत या स्थितीस पोहोचण्याआधी चिनी नेतृत्वाने कधीही याला धडा शिकवू, त्याला घरात घुसून मारू असली बाष्कळ विधाने केली नाहीत. त्यांनी आपली धोरणे तेवढी उद्योगस्नेही केली आणि जागतिक उद्योग जास्तीत जास्त प्रमाणात आपल्या देशात कसे येतील यासाठी रास्त पावले उचलली. अशा वेळी या उपायांपैकी आपण नक्की काय काय करीत आहोत असा प्रश्न विचारी जनांस पडणे आवश्यक. स्पर्धेमध्ये उतरण्यासाठी वा अधिकाधिक परदेशी कंपन्यांनी आपल्या देशात यावे यासाठी आपली धोरणे काय, हा मुद्दाही चर्चेस यायला हवा. निवडणुका आदी कार्यात निधीच्या थैल्या सैल सोडावयास उत्सुक स्थानिक 'लाला' धनवंतरायांचेच हात अधिक मजबूत करण्याव्यतिरिक्त अन्य जागतिक भांडवलास आकर्षून घेण्यासाठी आपले प्रयत्न काय, हेदेखील निदान शहाण्यांनी समजून घ्यायला हवे.

यावर परिचित वर्तुळातून आपण 'चीनची कशी बरोबरी करणार, तो काय हुकूमशाही देश आहे' छापाच्या बालिश प्रतिक्रिया व्यक्त होतील.

त्यांची संभावना बालिश अशी करायची, कारण गुंतवणूकदारांस लोकशाही आहे की अन्य काही याच्याशी काहीही घेणेदेणे नसते. त्यांचा संबंध एकाच घटकाशी असतो : गुंतवणुकीवरील परतावा. 'मांजर काळे की गोरे यात मला रस नाही, ते उंदीर पकडते की नाही, हे महत्त्वाचे' हे चिनी उदारीकरणाचे उद्गाते डेंग झिआओपिंग यांचे वचन या संदर्भात लक्षात घ्यावे असे.

तात्पर्य : आपण उद्योगस्नेही आहोत की नाही, हे अधिक महत्त्वाचे. चीनची सीमावर्ती परिसरातील घुसखोरी काळजी वाढवणारी खरीच. ती हाणूनच पाडायला हवी. पण या बाजारपेठेतील घुसखोरीस आपण कसे रोखणार, हेदेखील तितकेच महत्त्वाचे.

# ...अन् 'तो' सोनेरी केसांच्या ओळखीमुळे अडकला

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१
संगणक विभाग

MBMC/Computer/ 195 /2021-22 Date: 13/07/2021

// First Extension Tender Notice //

Mira Bhainder Municipal Corporation invites Online tender (GEM/2021/B/1324197) Request for Proposal for Government Community Cloud Hosting & Managed Services Vide No. MBMC/PRO/181/2021-22 dated 02/07/2021. But due to no response we extend the tender for the same work. The tender form and other relevant document will be available for download on MBMC's E-tendering website https://gem.gov.in till Dt. 20/07/2021 at 3.00 p.m. If possible the tenders will be opened in the presence of the bidders or their representative on Dt. 20/07/2021 upto 3.30 p.m. at the tender cell of Mira Bhainder Municipal Corporation.

Sign/-
(R.M. Gharat)
System Manager
Mira Bhaindar Municipal Corporation

Ref.: MBMC / PRO / 187 / 2021-22
Date : 13 / 7 / 2021

आकर्षक दिसावे म्हणून त्याने डोक्याचे केस सोनेरी केले होते. मात्र, तेच त्याला नडले. याच सोनेरी केसांच्या ओळखीमुळे एका गुन्ह्यात पोलिस त्याच्यापर्यंत पोहचले आणि त्याला गजाआड केले. लुटमारीच्या या प्रकरणाचा छडा पोलिसंनी अवघ्या सहा तासांत लावला व दोघांना अटक केली. राहुल हटेवार (२५) व नरेंद्र ऊर्फ बाली बोकडे (२०) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. मिनीमातानगर येथील ईश्वर कोठारी (२७) हा पेंटिंगची कामे करतो. काही कामानिमित्त तो बाहेरगावी गेला होता. बुधवारी सकाळी तो शिवनाथ एक्स्प्रेसने इतवारी रेल्वेस्थानकावर आला. गाडीतून उतरल्यानंतर दोन युवक त्याच्याजवळ येऊन 'ऑटोरिक्षा पाहिजे काय', असे विचारू लागले. फक्त ४० रुपयांत सौदा ठरला. अन्य ऑटोचालक मिनीमातानगरला जायला १०० रुपये घेतात, हे मात्र ४० रुपयांत नेत असल्याने ईश्वर खूश झाला व लगेच त्यांच्यासोबत निघाला. 'स्टेशनच्या बाहेर पुलाखाली ऑटो आहे',

# व्यापाऱ्याकडून शेतकऱ्याची फसवणूक; 'तो' भाजीव्यापारी गाळा विकून गायब

नाशिक येथील वयोवृद्ध शेतकऱ्याने दोन वर्षांपूर्वी बाजारातील एका भाजीव्यापाऱ्याला पाच लाख रुपयांचा शेतमाल पाठवला होता. मात्र त्याला पैसे न देताच व्यापारी तिथून गायब झाला आहे. आता स्वत:च्या घामाचे पैसे मिळावेत म्हणून शेतकरी बाजार समितीमध्ये नाशिक ते मुंबई अशा फेऱ्या मारत असून हे पैसे कधी मिळणार, याची आस त्याच्या डोळ्यांना लागून राहिली आहे.

सोमनाथ गणपत सानप असे या ६५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचे नाव आहे. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील वडगाव पिंगळा येथील ते रहिवासी आहेत. त्यांनी मुंबई घाऊक भाजीपाला मार्केटमधील ई विंगमधील गाळा क्रमांक ८३६ येथे दोन वर्षांपूर्वी कोबी पाठविले होते. या कृषिमालाचे पाच लाख ७५ हजार रुपये बिल झाले, मात्र त्यातील एकही पैसा अद्याप त्यांना मिळालेला नाही. या ठिकाणी एसएसके अँड कंपनी नावाने व्यापार करणारा व्यापारी मधुकर सुदाम डावखर याने त्यांची फसवणूक केली असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मालाच्या बदल्यात मे २०१९मध्ये दोन लाख रुपयांचा चेक या व्यापाऱ्याने दिला होता. तो सुद्धा वटला न गेल्याने शेतकरी हतबल झाला आहे. आपल्या मेहनतीचे पैसे मिळण्यासाठी ते बाजार समितीत फेऱ्या मारत




आहेत. मात्र दोन वर्षे नाशिक ते मुंबई फेऱ्या मारूनही त्यांच्या हातात काहीच लागले नाही.

याबाबत त्यांनी डिसेंबर २०१९मध्ये बाजार समिती अध्यक्ष आणि सचिवांना अर्ज केला होता. या अर्जावर बाजार समिती प्रशासनाने २९ जून २०२१मध्ये येथे दाखल त्यांच्या प्रकरणावर सुनावणीसाठी त्यांना पत्र पाठवले. त्यानुसार, १२ जुलै रोजी शेतमालाच्या गाडीत रात्री बसून शेतकरी सानप पहाटे भाजीपाला मार्केटमध्ये पोहोचले. तर, सुनावणीची वेळ सकाळी ११ वाजताची होती. त्यामुळे सुनावणीची वेळ येईपर्यंत ते बाजारात उपाशीपोटी बसून राहिले होते. काही व्यापाऱ्यांच्या लक्षात ही गोष्ट आल्यावर त्यांनी त्यांना चहा, नाष्टा दिला. मात्र इतके करूनही सुनावणी झालीच नाही. कारण कोणताच व्यापारी या सुनावणीला हजर राहिला नाही.

ज्या व्यापाऱ्याने माल मागवला होता, तो व्यापारी गाळा विकून बाजारातून गाशा गुंडाळून फरार झाला आहे. तसेच, ज्याने हा गाळा विकत घेतला आहे, त्यावर आता ही जबाबदारी आली आहे. ज्या व्यापाऱ्याने गाळा विकत घेतला आहे, त्याला गाळा हस्तांतरणासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांचा व्यवहार पूर्ण होऊ शकणार नाही. मात्र बाजार समितीच्या वतीने यावर कारवाई करण्यास सुरुवात झाली आहे.

# राहत्या घरात कर्मचाऱ्याची आत्महत्या; पेट्रोलपंप मालकाला अटक




तरुणाने राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना भोसरी येथे मंगळवारी (१३ जुलै) दुपारी घडली. तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पेट्रोलपंप मालकाला पोलिसांनी अटक केली आहे. गणेश लांडगे (वय २८, रा. इंद्रायणीनगर, भोसरी) असे अटक केलेल्या पेट्रोलपंप मालकाचे नाव आहे. तेजस तावरे (२३, रा. भोसरी, मूळ रा. लिंगी पिंपळगाव, ता. वाशी, जि. उस्मानाबाद) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. अमरजा पालकर (२५, रा. मांजरी बुद्रुक, ता. हवेली) यांनी या प्रकरणी भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

भोसरी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर आवताडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी लांडगे याचा पुणे-नाशिक महामार्गावर भोसरी येथील सदगुरूनगर येथे लक्ष्मी एनर्जी अँड फ्युएल नावाचा पेट्रोल पंप आहे. येथे तेजस काम करत होता. पंपावर तेजसने पैशांची अफरातफर केल्याचे सांगून आरोपीने तेजसला बोलावून घेतले. त्यानंतर आरोपीने त्याच्या ऑफिसमध्ये तेजसला मारहाण केली. त्याची दुचाकी व मोबाइल आरोपीने ठेवून घेतला. तुझ्या आई-वडिलांना फोन करून सांगून पोलिस केस करतो, अशी धमकीही दिली.

# ऑनलाइन मागविलेले पार्सलमधील महागडी वस्तू काढून तिने साबण ठेवला अन्...



औरंगाबाद : ऑनलाइन मागविलेले पार्सल घेऊन आलेल्या युवकाला, पेमेंट देण्याच्या नादात व्यग्र ठेवून, पती आणि पत्नीने त्यातील महागड्या वस्तू चोरून साबण ठेवून डिलिव्हरी बॉयला परत पाठवून दिल्याचे उघड झाले आहे. त्याच्या तक्रारीवरून निखिल नावाच्या व्यक्तीसह पत्नीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ई कार्ट मध्ये काम करणाऱ्या शेख आतिर सुलतान (२२, रा. बाबर कॉलनी, कटकट गेट) याने दिलेल्या माहितीनुसार, निखिलने मागविलेल्या एका पार्सलची किंमत ४९ हजार ९०० रूपये आणि दुसऱ्या पार्सलची किंमत ४७ हजार ९९८ रूपये होती. त्याला आठ जुलैला आतीरने फोन करून डिलिव्हरीची वेळ विचारली. त्याने पॅसिफिक हॉस्पिटल येथे बोलविले. तेथे गेल्यावर ऑनलाइन पेमेंटची अडचणी आली. त्यामुळे निखिलने रोख पेमेंट दिले. त्यानंतर पार्सल निखिलने पत्नीकडे दिले. रोख पैशांत पैसे कमी निघाले. त्याची जमवाजमव सुरू करण्याचा बहाणा करीत पार्सल पुन्हा घेतले. कंपनीच्या अधिकाऱ्यांना संशय आल्याने, त्यांना साबण दिसला. प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक तांगडे करीत आहेत.

काही वेळेतच केली हातचलाखी

पार्सल मागविणारा निखिल पैशांसाठी इकडेतिकडे फिरत होता. दहा ते पंधरा मिनिटे पार्सल पत्नीकडे होते.

पार्सल घेऊन त्याच्यातील वस्तू काढून साबण ठेवून दिल्याचा प्रकार समोर आला आहे.

# भुसावळ शहरात अज्ञात तरुणाचा निर्घृण खून; दगडाने ठेचला चेहरा



जळगाव जिल्ह्यातील भुसावळ शहरातील जामनेर रस्त्यावरील श्रद्धा कॉलनीत असलेल्या गजानन महाराज मंदिराजवळ काल (गुरुवारी)रात्री एका अज्ञात तरुणाचा निर्घृणपणे खून झाला आहे. आज शुक्रवारी सकाळी ही घटना उजेडात आल्यानंतर एकच खळबळ उडाली. मारेकऱ्यांनी तरुणाच्या अंगावर चाकूने वार केले आहेत. त्यानंतर मृताचा चेहरा दगडाने ठेचून विद्रुप केला आहे. श्रद्धा कॉलनीतील गजानन महाराज मंदिरात शुक्रवारी सकाळी काही नागरिक दररोजप्रमाणे दर्शनासाठी आले. त्यावेळी अज्ञात तरुण रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत पडलेला असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. मृतदेहाची स्थिती पाहून हा खुनाचा प्रकार असल्याचे स्पष्ट होत असल्याने, या घटनेची माहिती तत्काळ पोलिसांना देण्यात आली.खून झालेल्या तरुण हा ३२ ते ३५वयोगटातील आहे. मारेकऱ्यांनी त्याच्या अंगावर चाकूने वार केलेले असून, चेहरा दगडाने ठेचून विद्रुप केला आहे.

# पोलिसांनी आठ दिवसांत लावला खुनाचा छडा; आरोपीला नेपाळ सीमेवरुन अटक



सासवडजवळील एका वस्तीवर मागील आठवड्यात रस्त्याकडेला एक मृतदेह सापडला. शिताफीने तपास करून सासवड पोलिसांनी खुनाचा छडा लावला असून, आठ दिवसांत नेपाळ सीमेवरून आरोपीला अटक केली आहे. यासाठी पोलिसांचे पथक आठवडाभार नेपाळ सीमेवर वेषांतर करून वास्तव्याला होते.

निरंजन साहनी (वय २१, रा. नेपाळ) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याला सासवड न्यायालयात हजर केले असता १९ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. भगवान मारकड (वय ४५) असे खून झालेल्याचे नाव आहे. मृताच्या पत्नीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सासवड शहराजवळील बोरकरवस्तीलगत नऊ जुलै रोजी एका नाल्यात भगवान मारकड यांचा मृतदेह आढळला. मात्र, काहीच धागेदोरे नसल्याने तपासाची दिशा ठरत नव्हती. मृताची माहिती घेतली असता तो सोनोरी रस्त्यावरील एका दुकानात कामाला असल्याची माहिती मिळाली. त्याला दारूचेही व्यसन होते. त्याचा साथीदार साहनी हा येथील सचिन बोरकर यांच्या घरी फर्निचरचे काम करत होता. खुनाची घटना घडल्यापासून तो फरारी होता. तो मूळचा नेपाळ येथील असल्याने पोलिसांनी तेथे जाऊन तपास करण्याचे ठरवले. अतिरिक्त पोलिस अधीक्षक मिलिंद मोहिते आणि उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील यांच्या सूचनेनुसार आणि पोलिस निरीक्षक अण्णासाहेब घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक राहुल घुगे व पथकाने नेपाळ सीमा गाठली. दरम्यान, फरारी आरोपीने एका दुचाकीवरून सासवडहून थेट नेपाळ गाठले होते. तेथे त्याला पोलिसांनी अडवले असता त्याने दुचाकीच्या मालकाशी संपर्क साधला आणि 'मला पुणे येथे गाडीची कागदपत्रे नसल्याने पोलिसांनी पकडले आहे. मोबाइलवर कागदपत्रे पाठवा,' असे सांगितले. दुचाकीच्या मालकाला खुनाची माहिती नसल्याने त्यांनी कागदपत्रे पाठवली. तोपर्यंत राहुल घुगे तीन सहकाऱ्यांसह बिहारमध्ये दाखल झाले होते. साहनीला नेपाळमध्ये जाऊन अटक करणे अवघड असल्याने त्याच्या मोबाइल लोकेशनवरून माहिती घेतली असता तो नेपाळ सीमेवर भारताच्या हद्दीत ये-जा करत असल्याचे समोर आले. पोलिसांनी वेषांतर करून परिसरात सापळा रचला. बिहारी भाषेत संवाद साधला. आरोपीलाही काही संशय आला नाही. तो बिहार हद्दीतील बाजारात खरेदीसाठी आला असता पोलिसांनी त्याला अटक केली आणि विमानाने सासवडला आणले. दारू पिण्याच्या कारणावरून मारकड यांच्या डोक्यात फळीने मारहाण करून खून केल्याची कबुली आरोपीने दिली आहे. दरम्यान, राहुल घुगे व पथकाचे जिल्हा पोलिस अधीक्षक अभिनव देशमुख यांनी कौतुक केले आहे.

# सोन्याच्या आमिषाने सव्वालाखाची फसवणूक



येरवडा : सोशल मीडियाद्वारे एक ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने देण्याचे आमिष दाखवून सव्वालाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी चंदननगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. योगेश हिम्मतसिंग ठाकूर (वय ३२, रा. वडगाव शेरी) यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोशल मीडियाद्वारे एका व्यक्तीने मुंबईतील मालाडमध्ये एक ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तयार करत असून, आठ वेगवेगळ्या डिझाइनचे २४५ नग विकत देणार असल्याची जाहिरात केली होती. फिर्यादी यांनी जाहिरात पाहून संबंधित व्यक्तीशी मोबाइलवर संपर्क साधला. त्याने सोने खरेदीसाठी सव्वालाख रुपये भरण्यास सांगितले. फिर्यादी यांनी पैसे भरूनही सोने मिळाले नाही.

# महिलेने नवऱ्याचा खून करून आत्महत्येचा बनाव केला अन्...




नवऱ्याचा खून करून आत्महत्येचा बनाव रचणाऱ्या पत्नीचा डाव मुलीने उधळून लावला. अंत्यसंस्काराच्या वेळेला 'आईनेच बाबाला मारले,' असे मुलीने सांगितल्याने खुनाच्या घटनेला वाचा फुटली.

दिपक बलवीर सोनार (वय ३६, रा. गुरुवार पेठ) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ही घटना सोमवारी (१२ जुलै) रात्री साडे अकराच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी, खडक पोलिसांनी पत्नी राधिका दिपक सोनार (वय ३४, रा. गुरुवारपेठ) हिला ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिपक सोनार हा गुरुवार पेठेतील एका जुन्या वाड्यात रखवालदाराचे काम करतो. तो पत्नी, मुलगा आणि मुलगी यांच्यासह तेथे राहत होता. राधिका एका कपड्याच्या दुकानात काम करते. घटनेच्या दिवशी राधिकाने दिपकला जेवायला वाढले. या वेळी दिपकने ते ताट राधिकाच्या अंगावर फेकले. त्यानंतर त्यांच्यात वाद झाला. राधिकाने दिपकला बॅटने मारहाण केली आणि गळा दाबला. त्यात दिपकचा मृत्यू झाला. मात्र, कोणाला संशय येऊ नये म्हणून राधिकाने दिपकचा मृतदेह बाथरूममध्ये ओढत नेला. तेथे मृतदेह दोरीला लटकवला आणि आत्महत्या केल्याचे भासवले. घडलेल्या प्रकाराबाबत कोणाला काही सांगू नका, असे म्हणून तिने मुलांनादेखील दम दिला. यानंतर मुलांना घेऊन राधिका दोन दिवस बाहेर गेली. परत आल्यानंतर तिने पतीने आत्महत्या केल्याचे भासवून आक्रोश केला. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अकस्मात मृत्यूची नोंद केली.

दरम्यान, राधिकाने पती दिपकला मारल्याचे त्यांच्या मुलीने पाहिले होते. अंत्यसंस्कारावेळी मुलीने आईनेच वडिलांचा खून केल्याचे नातेवाइकांना सांगितले. त्यानंतर त्यांनी याची माहिती पोलिसांना दिली.

त्यानुसार पोलिसांनी तपास करून आरोपी महिलेला ताब्यात घेतले. पुढील तपास खडक पोलिस करत आहेत.

# आमदार गणपत गायकवाडांच्या मुलाची ४० लाखांची फसवणूक



शिक्षणाबाबतचे सॉफ्टवेअर तयार करून ते विविध शिक्षण संस्थांना विकून त्यातून बक्कळ पैसा मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवत आशीषकुमार चौधरी या सोफ्टवेअर इंजिनीअरने आमदार गणपत गायकवाड यांचा मुलगा प्रणव गायकवाड यांची दोन महिन्यांत ३९ लाख २० रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार कल्याण पूर्वेकडील कोळसेवाडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. त्यानुसार पोलिसांनी चौधरीविरोधात गुन्हा दाखल करत त्याचा शोध सुरू केला आहे.

प्रणव यांच्या मालकीची मायक्रोनेट एटरप्रायझेस ही कंपनी असून, यामध्ये चौधरी सोफ्टवेअर डेव्हलपमेंटचे काम करत होता. त्याने प्रणव यांचा विश्वास संपादन करून शिक्षण संस्थासाठी लागणारे सॉफ्टवेअर तयार करून ते विकून बक्कळ पैसा मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवले. त्यासाठी ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० या कालावधीत त्याने प्रणव यांच्याकडून ३९ लाख २० हजार रुपये घेतले. हे सॉफ्टवेअर डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्था आणि जळगाव विद्यापीठ यांना विकत असल्याबाबत बनावट ई-मेल व जळगाव विद्यापीठाबरोबरचा बनावट करार त्याने प्रणव यांना सादर केला. मात्र पैसे घेऊन चौधरी गायब झाल्यानंतर कागदपत्राची तपासणी केली असता ती बनावट असल्याचे स्पष्ट झाले.

# आई न बनू शकल्यानं महिलेला सासरच्यांकडून अघोरी शिक्षा



रांची : एखाद्या महिलेवर मातृत्वाची जबरदस्ती केली जाते किंवा घराण्याला वंशाचा दिवा देऊ शकत नाही म्हणून महिलेला ठार मारण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतं, हे कदाचित काहींना अतिशयोक्ती वाटू शकते. परंतु, अशी खरीखुरी घटना झारखंडमध्ये घडल्याचं समोर आलंय. गर्भधारणा न करू शकल्यानं एका महिलेला तिच्या पतीसहीत सासरच्या मंडळींनी ठार मारण्याचा प्रयत्न केला. लोखंडाची सळी गरम करून महिलेच्या खासगी अंगांना इजा पोहचवण्यात आली तसंच तिला तिच्या शरीराचा कंबरेचा भाग जाळण्याचाही प्रयत्न करण्यात आला.

झारखंडमधल्या गढवा जिल्ह्यातील पार्सपानी गावात ही घटना घडल्याचं समोर आलंय. पीडित महिला सध्या रुग्णालयात दाखल असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याचं पोलिसांनी सांगितलंय. आरोपी पती दिनेश प्रसाद गुप्ता याच्यासहीत इतर आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढचा तपास सुरू असल्याचं पोलिसांनी म्हटलंय.

दिनेश गुप्ता याची पत्नी गेल्या १२ वर्षांपासून गर्भधारणेसाठी प्रयत्न करत होती. परंतु, काही वैद्यकीय कारणांमुळे तिला काही अडचणींना सामोरं जावं लागलं. मूल न होऊ शकल्यानं तिला सासरच्या छळालाही सामोरं जावं लागत होतं. गेल्या बुधवारी महिलेला अपत्याला जन्म न देण्यासाठी सर्वात अघोरी शिक्षेला सामोरं जावं लागलं. पती, सासरा तसंच सासरच्या इतर मंडळींनी महिलेचा शरीराचा खालचा भाग तापलेल्या लोखंडी रॉडनं जाळला. यात महिला गंभीर जखमी झाली आहे.

सासरच्या मंडळींच्या तावडीतून कशीबशी सुटून जंगलात पळून जाण्यात यशस्वी ठरल्यानं तिचा जीव वाचल्याचं पीडितेच्या आईनं म्हटलंय. घरातून पळून गेल्यानंतर महिलेनं आपल्या माहेरच्या कुटुंबाशी आणि आई पुष्पांजली देवी यांच्याशी संपर्क साधला.

माझ्या मुलीला गेल्या अनेक वर्षांपासून सासरी मारहाण होत होती. त्यांनी गरम रॉडनं तिला जाळण्याचाही प्रयत्न केला. तिनं कशीबशी मला याची माहिती दिली. त्यानंतर आम्ही तिला रुग्णालयात दाखल केलं, असं पीडितेच्या आईनं म्हटलंय. तसंच आपल्या मुलीसाठी न्यायाची मागणी केलीय.

# साक्षीदारांच्या संख्येत मोठी घट; मालेगावप्रकरणी एनआयएची न्यायालयात माहिती



'मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात सध्या सुरू असलेल्या खटल्यातील साक्षीदारांची संख्या कमी करण्यात आली असून, आणखी सुमारे शंभर साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात येईल. पूर्वी चारशेहून अधिक साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याचे नियोजन होते. मात्र, आता ती संख्या मोठ्या प्रमाणात कमी करण्याचे एनआयएने ठरवले आहे,' अशी माहिती राष्ट्रीय तपास संस्थेतर्फे (एनआयए) अॅड. संदेश पाटील यांनी गुरुवारी मुंबई उच्च न्यायालयात दिली.

या प्रकरणातील आरोपी लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहितने त्याच्याविरोधात खटला चालवण्यास देण्यात आलेल्या पूर्वसंमतीच्या वैधतेला याचिकेद्वारे आव्हान दिले आहे. त्याविषयी न्या. संभाजी शिंदे व न्या. निजामुद्दीन जमादार यांच्या खंडपीठासमोर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पुढील सुनावणी झाली.

तेव्हा, खटला कधी पूर्ण होणार आणि आणखी किती साक्षीदारांच्या साक्षी तपासल्या जाणार आहेत, अशी विचारणा खंडपीठाने केली. त्यावर 'आतापर्यंत विशेष एनआयए न्यायालयाने या खटल्यात १८१ साक्षीदार तपासण्यात आले आहेत. पूर्वी एकूण चारशेहून अधिक साक्षीदारांची नावे न्यायालयात देण्यात आली होती. मात्र, आता त्यात मोठी घट करण्याचे ठरवण्यात आले आहे. आणखी शंभरहून अधिक साक्षीदारांच्या साक्षी नोंदवण्यात येणार असल्याचे एनआयएच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. अशा साक्षीदारांमध्येही पंच साक्षीदार असले की त्यांची साक्ष व उलटतपासणी लवकर होते. जे महत्त्वाचे साक्षीदार असतात त्यांची उलटतपासणी करण्यात बचाव पक्षाचे वकीलही अधिक वेळ घेतात,' अशी माहिती पाटील यांनी न्यायालयाला दिली.

'एनआयए न्यायालयाने पुरोहित यांना आरोपमुक्त करण्याचा अर्ज फेटाळल्यानंतर विशिष्ट कागदपत्रे उपलब्ध करण्यात आली आहेत. त्यामुळे आरोपमुक्तीच्या विनंतीचा हा विषय पुन्हा एनआयए न्यायालयाकडे वर्ग करण्यात यावा,' अशी विनंती पुरोहिततर्फे अॅड. श्रीकांत शिवदे यांनी केली. मात्र, त्याला पाटील यांनी विरोध दर्शवला. 'याचिकादार केवळ याचिका मागे घेणार असल्यास आमची हरकत नाही. मात्र, न्यायालयाकडून कोणताही आदेश होणार असेल तर आम्हाला युक्तिवाद मांडण्याची संधी मिळायला हवी,' असे म्हणणे पाटील यांनी मांडले. त्यामुळे खंडपीठाने याविषयीची पुढील सुनावणी १९ जुलैला ठेवली.

आरोपी विक्रम भावेला तात्पुरता दिलासा

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येच्या प्रकरणात दोन वर्षे गजाआड राहिल्यानंतर सशर्त जामीन मिळालेला आरोपी विक्रम भावे याला मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी तात्पुरता दिलासा दिला. पुण्यातून कोकणात जाणे आणि तिथे तीन आठवडे राहण्याची परवानगी न्यायालयाने त्याला दिली.

भावेच्या वडिलांचे निधन झाल्याने त्याने मूळ गावी जाऊन अंत्यविधी करणे तसेच वडिलांचे बँकिंग व्यवहार मार्गी लावण्याकरिता अटींमधून तात्पुरता दिलासा देण्यासाठी त्याने उच्च न्यायालयात अर्ज केला होता.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898